JO (07)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** नांदगांव **Year (वर्ष):** 2022
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0288 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/09/2022 18:37 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 27/07/2022
      **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/07/2022
      **Time From (वेळेपासून):** 17:19 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:47 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 13/09/2022 **Time (वेळ):** 17:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 018 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/09/2022 18:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** नांदगांव पोलीस स्टेशन च्या , आवारात

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** अक्षय अशोक शेरेकर
   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2000 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | वेहेळगांव तानांदगांव,नांदगांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | वेहेळगांव तानांदगांव,नांदगांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-8308202629

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरेश सागंळे पोलीस हवालदार | | | 1. नेमणुक - नांदगाव पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण,,नांदगांव,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अभि उगलमुगले पोलीस शिपाई | | | 1. नेमणुक-नांदगाव पोलीस स्टेशन , नाशिक ग्रामीण ,नांदगांव,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादनांदगांव पोलीस ठाणे,नाशिक ग्रामीण दिनांक 13/09/2022मी श्री अक्षय अशोक शेरेकर वय 22 वर्ष व्यवसाय-शेती राहणार वेहेळगांव ता.नांदगांव जि.नाशिक.,मो.क्रं.8308202629समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो कि, मी वरील ठिकाणी कुटूंबासह राहत असून आमची वडिलोपार्जित शेती करून माझे कुंटुबाचा उदरनिर्वाह करतो. मी माझे शेतीकामासाठी नोव्हेंबर 2021 मध्ये आयशर कंपनीचा टक्टर क्रमांक एमएच-34-एल-0670 हा सेकंडहण्ड आमच्या गांवातील श्री गजानन शेळके यांच्याकडुन खरेदी केला होता. मला दिनांक 8/4/2022 रोजी आमच्या गांवातील लोखंडी पाईप वाहतुकीचे भाडे मिळाले होते. मी गावातील लोखंडी पाईपची वाहतुक करीत असतांना गांवातील गावातील लोकांनी व पोलीस पाटील यांनी माझा टक्टर पकडला त्यानंतर पोलीस पाटीलाने नांदगांव पोलीस स्टेशनला कळविले व त्यानंतर मला व माझा टक्टर नांदगांव पोलीस स्टेशन येथे जमा केले होते. त्यावेळी मी नांदगांव पोलीस स्टेशन येथील पीएसआय मनोज वाघमारे व पोलीस सुरेश सांगळे यांना मी लोखंडी पाईपची चोरी केली नसुन मला लोखंडी पाईप वाहतुकीचे भाडे मिळाले असल्याचे सांगीतले होते. तरी देखील पीएसआय मनोज वाघमारे व पोलीस सुरेश सांगळे यांनी मला सोडुन दिले होते परंतु माझा टक्टर पोलीस स्टेशनला जमा करून घेतला होता. त्यानंतर मी वेळोवेळी नांदगांव पोलीस स्टेशनला जावुन माझा टक्टर सोडण्यासाठी मी पीएसआय मनोज वाघमारे व पोलीस सुरेश सांगळे यांना समक्ष भेटुन विनंती केली असता त्यावेळी त्यांनी मला माझा टक्टर चोरीचा आहे तसेच ज्या इसमाचे पाईप आहे त्यांचे कडे चौकशी करायची आहे असे सांगुन ते माझा ट्रॅक्टर सोडण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याने मी माझे ट्रॅक्टर खरेदी केल्याची नोटरी तसेच लोखंडी पाईपचे मालक श्री किरण पाटील यांनी देखील लिहुन दिले की लोखंडी पाईप हे चोरीला गेले नाही. तरी देखील नांदगांव पोलीस स्टेशनचे पोलीसांनी माझा टक्टर सोडत नव्हते.त्यानंतर मी दिनांक 23/7/2022 रोजी माझा टक्टर सोडविण्यासाठी नांदगांव पोलीस स्टेशनला गेलो असता पोलीस स्टेशनला पीएसआय मनोज वाघमारे, पोलीस सुरेश सांगळे व अभिजित उगलमुगले यांना भेटलो असता त्यांनी माझा टक्टर सोडण्याच्या मोबदल्यात माझेकडे 50,000/- रूपयांची मागणी करून तडजोडअंती 35,000/- रूपये दिनांक 27/7/2022 रोजी नांदगांव पोलीस स्टेशन येथे घेवुन येण्यास सांगीतले आहे. परंतु मला पीएसआय मनोज वाघमारे, पोलीस सुरेश सांगळे व अभिजित उगलमुगले यांना लाच देण्याची ईच्छा नसून त्यांचेविरूध्द योग्य ती कायदेशिर कारवाई करावी ही विनंती. नांदगांव पोलीस स्टेशनचे पीएसआय मनोज वाघमारे, पोलीस सुरेश सांगळे व अभिजित उगलमुगले यांचेत व माझेत कोणताही आर्थिक व्यवहार नाही. तसेच आमचेत कोणतेही पुर्व-वैमनस्य नाही.परंतु मला

पीएसआय मनोज वांघमारे, पोलीस सुरेश सांगळे व अभि उगलमुगले यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी म्हणुन मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे कळविले होते. त्याप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक श्री.संदीप साळुंखे यांनी मला ते सापळा पथकासह दिनांक 27/07/2022 रोजी माझी तक्रार नोंदवुन घेण्यासाठी नादंगाव बस स्थानकाच्या आत मध्ये सुरक्षित स्थळी येथे येणार असल्याचे कळवुन माझे सांगणेवरुन मला देखील नांदगांव बस स्थानक आतमध्ये थांबण्याबाबत सुचना दिली होती. त्याप्रमाणे मी अगोदरच नांदगांव बस स्थानक मध्ये थांबलो होतो. त्यानंतर काही वेळातच पोलीस निरीक्षक श्री.संदीप साळुंखे हे सापळा पथकासह एका खाजगी चारचाकी वाहनांनी सदर ठिकाणी आल्यानंतर मी त्यांना माझी ओळख सांगुन त्यांचेकडील खाजगी वाहनात जाउन बसलो. मी वाहनात बसल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.संदीप साळुंखे यांनी त्यांची स्वतःची तसेच कार्यकारी अभियंता गिरणा नदी खोरे प्रकल्प विभाग, नाशिक या विभागाकडील पंच श्री. दिनेश सिताराम राऊत व श्री.मनोज दिपक स्वर्गे तसेच सापळा पथकातील सर्व सदस्यांचा परिचय करून देवुन माझाही परिचय सर्वांना करून दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.साळुंखे यांनी पंचासमक्ष मला माझे तक्रारी बाबत विचारले असता त्यांना मी माझी तक्रार सांगुन तक्रार माझे हस्ताक्षरात लिहुन दिली व त्यावर सही केली. तसेच सदर तक्रारीवर पोनि श्री. साळुंखे व दोन्ही पंचांनी सहया केल्या. मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे नांदगाव पोलीस स्टेषन नाशिक ग्रामीण चे पीएसआय मनोज वाघमारे, पोलीस सुरेश सांगळे व अभि उगलमुगले हे खरोखरच लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच श्री.राउत असे आम्हाला पोनि श्री.साळुंखे यांनी योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉंर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन पोना/देशमुख यांनी रेकॉंर्डर चालू करुन माझे शर्टच्या आत बनियनला सेफ्टीपिनने अडकवुन देवुन मला खाजगी वाहनातुन उतरवुन पायी नांदगांव बस स्थानक येथुन 17/19 वाजता रवाना केले. त्यानंतर मी व पंच श्री.राउत असे आम्ही पायी चालत नांदगांव पोलीस स्टेशन मध्ये गेलो मी पीएसआय श्री.वाघमारे यांचेशी सपंर्क केला त्यावेळी ते रजेवर असल्याचे सांगुन त्यांनी मला दिनांक 28/8/2022 रोजी नांदगाव पोलीस स्टेशन येथे भेटण्याकरीता येण्यास सांगितले होते. त्यानंतर मी पोलीस श्री. सुरेश सांगळे उर्फ बाबा यांचेशी फोनवरून संपर्क केला असता थोडयावेळात पोलीस श्री.सुरेश सांगळे उर्फ बाबा व पोलीस अभि उगलमुघले हे नांदगाव पोलीस स्टेशनचे आवारात माझेकडे येवुन मला भेटले.. सदरवेळी पोलीस श्री. सुरेश सांगळे उर्फ बाबा यांनी माझे कडे माझा ट्रक्टर सोडविण्याकरीता 35,000/ -रूपये लाचेची मागणी केली. सदरची रक्कम ही ते पीएसआय वाघमारे साहेब यांचेसाठी घेत असल्याचे भासवून 35,000/-रूपये दिल्यास पोलीस सांगळे/उर्फ बाबा हे स्वतः माझे ट्रॅंक्टर सोडून देणार असल्याचे सांगितले. दरम्यान पोलीस अभि उगलमुगले यांनी पोलीस सांगळे यांचे लाच मागणीस प्रोत्साहन दिले. त्याबाबतचे संभाषण शासकीय व्हाईस रेकॉंर्डर मध्ये रेकॉंर्ड झालेले आहे. त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे. दिनांक 27/8/2022 रोजी दिलेल्या सुचनेवरून, मी दिनांक 28/8/2022 रोजी नांदगाव बस स्थानक येथे हजर असताना 11/15 वाजेच्या सुमारास श्री.संदीप साळुंखे,दोन पंच, सापळा पथक असे सर्व साहित्यासह शासकीय वाहनाने नांदगांव बस स्थानक येथे आले. त्यावेळी त्यांनी मला शासकीय वाहनात बसण्याचा इशारा केला असता मी शासकीय वाहनात बसलो. त्यावेळी पुन्हा आमची आपसात ओळख करून घेतली. पीएसआय वाघमारे यांनी मला नांदगाव पोलीस स्टेशन येथे भेटण्याकरीता बोलविलेले आहे म्हणुन ते खरोखर माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच श्री. राउत असे आम्हाला पोनि श्री.साळुंखे यांनी योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉंर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन पोना/देशमुख यांनी रेकॉंर्डर चालू करुन शर्टच्या आत बनियनला सेफ्टीपिने अडकवुन दिले. त्यानंतर मला नांदगांव पोलीस स्टेशन येथे जाण्यासाठी शासकीय वाहनातुन उतरवुन पायी नांदगांव बस स्थानक येथुन 12/36 वाजता रवाना केले. त्यावेळी मी पंच नंबर 1 श्री. राउत असे पायी चालत नांदगांव पोलीस स्टेशनला जावुन पीएसआय मनोज वाघमारे यांचे रूम मध्ये त्यांची भेट घेण्यासाठी गेलो असता पीएसआय मनोज वाघमारे हे उपस्थित नसल्याने मी त्यांचेशी सपंर्क केला असता पीएसआय मनोज वाघमारे हे एका सप्ताहाचे ठिकाणी असुन पोलीस स्टेशनला येण्यासाठी उशीर लागेल, असे समजले. त्यानंतर आम्ही व पंच सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.साळुंखे साहेब यांनी पुन्हा मला सुचना देवुन पंच नं. 1 श्री.राऊत यांना सोबत घेवुन नांदगांव पोलीस स्टेशन येथे जावुन पीएसआय मनोज वाघमारे, यांची भेट घेण्याकरीता व्हाईस रेकॉंर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन रेकॉंर्डर चालु करून रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं.1 श्री.राऊत पायी चालत नांदगांव पोलीस स्टेशनला जावुन पीएसआय मनोज वाघमारे यांचे रूम मध्ये त्यांची भेट घेण्यासाठी गेलो असता पीएसआय मनोज वाघमारे हे उपस्थित नसल्याने त्यांना फोन करून मी पोलीस स्टेशनला आल्याचे कळविले. त्यानंतर पोलीस अभि उगलमुघले भेटले व म्हणाले की, अरे काल सगळे तुझावर डाऊट घेत होत तसेच पोलीस उगलमुगले यांनी पंच नंबर 1 श्री.राउत यांचेवर संषय दाखवुन त्यांचेकडे ते संषयीतरित्या पाहत होते त्यामुळे व मी व पंच नंबर 1 असे नांदगांव पोलीस स्टेशनच्या बाहेर येवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकणी परत आलो.. त्याबाबतचा सविस्तर पंचनामा दिनांक 28/07/2022 रोजी करण्यात आलेला आहे. दिनांक 03/08/2022 रोजी मला नांदगाव पोलीस ठाणेत बोलावुन माझा ट्रॅंक्टर पोलीस हवालदार श्री.कांदळकर यांनी त्यांना परत केला आहे. परंतु पोलीस सांगळे व अभि उगलमुगले यांना पंच नंबर 1 वर संशय आल्याने पुढे माझेकडुन पोलीस लाचेची रक्कम स्वीकारणार नाहीत त्यामुळे पोलीस सांगळे व पोलीस अभि उगलमुगल यांचेवर पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याबाबतचा सविस्तर जबाब मी ला.लु प्रतिबधक विभाग नाशिक येथे लिहुन दिलेला आहे. तरी दिनांक 27/07/2022 रोजी, सायंकाळी 17/19 ते 17/47 वाजेच्या दरम्यान,नांदगांव पोलीस स्टेशन च्या आवारात श्री. सुरेश सागंळे उर्फ सांगळे बाबा, व्यवसाय - नोकरी, पोलीस हवालदार, नेमणुक - नांदगाव पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण, यांनी नांदगांव पोलीस स्टेशन येथे जमा असलेला माझा आयशर कंपनिचा ट्रक्टर क्र एम.एच.34 एल.0670 हा सोडण्यासाठी माझेकडे 35,000/ -रूपये लाचेची मागणी केली. तसेच पोलीस शिपाई अभि उगलमुगले यांने लाच मागणीच्या चर्चा दरम्यान, हे पटकन मिटव, मी देवु का तुला, आम्ही पार जुळीत इथ पर्यत आणल आम्ही तोंडावर पडु असे म्हणुन पोलीस हवालदार श्री.सांगळे यांनी केलेल्या लाच मागणीस प्रोत्साहन दिले म्हणुन लोकसेवक श्री.सुरेश सागंळे उर्फ सांगळे बाबा ,व्यवसाय -नोकरी, पोलीस हवालदार, नेमणुक-नांदगावं पोलीस स्टेशन नाशिक ग्रामीण, तसेच पोलीस शिपाई अभि उगलमुघल व्यवसाय -नोकरी, पोलीस शिपाई, नेमणुक-नांदगावं पोलीस स्टेशन नाशिक ग्रामीण यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचुन पाहिली असुन ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे. समक्ष हि फिर्याद दिली

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): rameshwar mohanlal gade(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

पोलीस ठाणे अमलदार

नांदगाव पोलीस ठाणे ना.ग्रा.

**Name** (नाव): rameshwar mohanlal gade

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): pi